Add

७e

**हैद्राबाद मुक्ती संग्रामातील उस्मानाबाद जिल्हयातील देवधानोरा, चिलवडी व नंदगांव या तीन जळीत गावातील ग्रामस्थांना एक रकमी नुकसान भरपाई मंजूर करण्याबाबत**.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२००९/प्र.क्र.१७२/०९/स्वासैक-१,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १४ सप्टेंबर, २०१०.

**वाचा:-**

१) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक संकीर्ण१००१/प्र.क्र.७९/२००१/स्वासैक-१,दि.०६.०८.२००१
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक संकीर्ण१००३/११९/प्र.क्र.१२३/०३/स्वासैक-१,दि.१७.०३.२००५
३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांकसंकीर्ण२००८/११९/प्र.क्र.१३७/०८/स्वासैक-१,दि.२४.०९.२००८
४) श्री.प्रभाकर व्यंकटराव नळदुर्गकर, नंदगाव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांचा दि.०१.०४.२००९ चा अर्ज.
५) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.२००९/उपचीट/एमएजी-२-सीआर-२०, दि.२.१२.२००९.

**प्रस्तावना:-**

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये उस्मानाबाद जिल्हयातील देवधानोरा, चिलवडी व नंदगाव या तीन गावात रझाकारांनी केलेल्या अत्याचारात होरपळलेल्या ग्रामस्थांचा प्रश्न सोडविण्यासाठी के. विजयेंद्र काब्रा, तत्कालिन सभापती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६-८-२००१ च्या शासन निर्णयानुसार एक उप समिती नेमण्यात आली होती. सदर उपसमितीच्या अहवालानुसार मौजे देवधानोरा, चिलवडी व नंदगाव या तीन गावातील १३५ ग्रामस्थांना प्रत्येकी रु. २ लाख प्रमाणे एक रक्कमी नुकसान भरपाई दि.१७ मार्च,२००५ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली. त्यानंतर उपरोक्त तीन गावातील उर्वरित ग्रामस्थांची मागणी विचारात घेऊन जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी गावाचे सर्वेक्षण घेऊन या संदर्भात सादर केलेल्या अहवालानुसार ज्या कुटुंबाना स्वातंत्र्य सैनिक पेन्शन अथवा रु. २ लाख नुकसान भरपाई यापूर्वी देण्यात आलेली नाही,अशा देवधानोरा, चिलवडी व नंदगाव या तीन गावातील बाधीत ४५० ग्रामस्थांना प्रत्येकी रु.२ लक्ष इतकी नुकसान भरपाई देण्याच्या मंत्रीमंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने दि.२४ सप्टेंबर,२००८ च्या शासन निर्णयान्वये ४५० ग्रामस्थांना प्रत्येकी रु.२.०० लाख इतकी नुकसान भरपाई देण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये ४५० बाधित ग्रामस्थांचा तपशिल/यादी

कृ.मा.प.

सादर केला होता. तथापि, सदर यादीमध्ये श्री. प्रभाकर व्यंकटराव नळदुर्गकर, यांचे नंदगाव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील शेतातील अन्नधान्य, बैलबारदाना यांचे रझाकारांच्या अत्याचारात झालेल्या नुकसानीचा अंतर्भाव सदर शेत गावाबाहेर असल्याने समाविष्ठ करण्याचे राहून गेले होते. यासंदर्भात जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी संदर्भाधिन दि.२.१२.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अभिप्रायानुसार श्री. प्रभाकर व्यंकटराव नळदुर्गकर यांना अन्य ग्रामस्थांप्रमाणे एकरकमी रु.२.०० लाख नुकसानभरपाई मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

शासन आता या शासन निर्णयान्वये असे आदेश देत आहे की, हैद्राबाद मुक्ती संग्रामात रझाकारांनी केलेल्या अत्याचारामध्ये श्री. प्रभाकर व्यंकटराव नळदुर्गकर यांना त्यांच्या नंदगाव, ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद येथिल शेतातील बैलबारदाना, अन्यधान्य व अन्य नुकसानी प्रित्यर्थ रु.२.०० लाख (रु. दोन लाख फक्त) इतकी एकरक्कमी नुकसानभरपाई मंजूर करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत ही एकरक्कमी रु.२.०० लाख नुकसानभरपाईची रक्कम श्री.प्रभाकर व्यंकटराव नळदुर्गकर यांना देण्यात यावी. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी याप्रकरणी कार्यपूर्ती अहवाल शासनास सादर करावा.

३. या प्रित्यर्थचा खर्च "मागणी क्र.ए-५,२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, २००- इतर कार्यक्रम(००)(११) हैद्राबाद मुक्ती संग्रामात रझाकारांच्या अत्याचाराने पिडीत ग्रामस्थांना वित्तिय सहाय्य (२२३५ ३१६८) (योजनेतर) (दत्तमत) २०-इतर प्रशासनिक खर्च" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ या वित्तिय वर्षामध्ये पुरवणी मागणीन्वये मंजुर झालेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौ.संदर्भ क्र.अनौसं-३४९/व्यय-४ दि.०४.०६.२०१० नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ज्ञा.ल. सुळ)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. राज्यमंत्री (सा.प्र.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई, महाराष्ट्र-२, नागपूर
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई, महाराष्ट्र-२, नागपूर,

D:\2010\general\gr-cr-172-09.lwp